जा. क्र. माध्य. ३/प्रथम मान्यता/पुवि ६८५८
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे – १ यांचे कार्यालय.
दिनांक :- 17 MAY 2001

प्रति,
शिक्षणाधिकारी [माध्यमिक],
जिल्हा परिषद पुणे

विषय :- प्रथम मान्यता.
वनेश्वर माध्यमिक विद्यालय, तिरपाड, ता. आंबेगाव

संदर्भ :- आपले पत्र क्र. शिक्षण/माध्य/६-२/प्र. मा. /२०००-०१ दिनांक ३०.४.२००१

वरील संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१, ३.२, ३.३ अन्वये संस्थेच्या आदिवासी समाजसेवा शिक्षण प्रसारक मंडळ वनेश्वर माध्यमिक विद्यालय तिरपाड माध्यमिक शाळेच्या इयत्ता ८वी /////वी च्या वर्गास सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षासाठी जून २००० पासून प्रथम मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता खालील अटींच्या पूर्ततेस अधीन राहून देण्यात येत आहे. शिक्षणाधिकारी [माध्यमिक] यांनी खालील अटींची पूर्तता शाळा करीत आहे किंवा कसे याची तपासणी करून पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठविताना खालील अटी पूर्ण केलेल्या आहेत किंवा कसे याबाबतही अहवाल प्रस्तावासोबत पाठविण्यात यावा.

१] संस्थेने स्वत:च्या मालकीची शैक्षणिकदृष्टया योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करून द्यावी.
२] मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तीची नेमणूक करावी.
३] स्वतंत्र व विषयावार प्रयोगशाळा सर्व साहित्यानीशी उपलब्ध करून द्यावी.
४] स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करून दरवर्षी अधिक ग्रंथाची भर घालावी.
५] विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून द्यावे.
६] पुरेसा प्रशिक्षित शिक्षक वर्ग उपलब्ध करून द्यावा.
७] स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध करून द्यावी.
८] वाढीव फी चे दर मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून मंजूर करून घ्यावेत.
९] शालेय रेकॉर्ड माध्यमिक शाळा संहिता नियमाप्रमाणे ठेवून त्यात अद्ययावत नोंदी घेण्यात याव्यात.
१०] कर्मचा-यांना सरकारी वेतनश्रेणीनुसार वेतन अदा करावे.
११] शिक्षकांची भविष्य निर्वाह निधी खाती उघडावीत.
१२] विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करावी.
१३] तपासणी अहवालातील सूचनांची पूर्तता करावी.
१४] अध्यापनात शैक्षणिक साधनांचा वापर करण्यात यावा.
१५] विद्यार्थ्यांचा विविध परिक्षा, उपक्रम यात सहभाग असावा.

स्वाक्षरित ज. सं. बांगी
सही असे

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१.

प्रत :- मुख्याध्यापक, वनेश्वर माध्यमिक विद्यालय, तिरपाड, ता. आंबेगाव
२. निवडनस्ती.

तिरपाड
ता.आंबेगाव,जि.पुणे

"यशवंतराव चव्हाण भवन"
जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग [माध्यमिक].
जा. क्र. शिक्षण/माध्य/ह-४/नै. वा. /०२/०३
पुणे, दि. ५/६/२००२

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,

वनेश्वर माध्यमिक विद्यालय, तिरपाड.
ता. आंबेगाव

विषय :- नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत. ०२-०३
~~इ. ६ वी~~, ~~इ. ७ वी~~, ~~इ. ९ वी~~, इ. १० वी.

आपल्या आदिवासी समाजसेवा शि. प्रसा. मंडळ या शैक्षणिक संस्थेव्दारा संचलित वनेश्वर माध्यमिक विद्यालय, तिरपाड माध्यमिक विद्यालयास इ. ८ वी / ~~इ. ५ वी~~ या वर्ग सुरु करणेस सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षापासून मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचेकडील आदेश क्र. माध्य/३[१४]/नमाशा/मान्यता/पुवि/३०१६/२०००, दि. ८/३/०१ अन्वये शासनाची परवानगी मिळालेली आहे. सन २००२-२००३ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या माध्यमिक शाळेत ~~इ. ६ वी, इ. ७ वी, इ. ९ वी~~, इ. १० वी या वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत आहे. सदर वर्गास जून २००२ पासून नैसर्गिक वाढीने परवानगी देणेत येत आहे. तरी आपण सदर वर्गाची धार्मिक तपासणी करुन घेणेसाठी संबंधित ~~उपशिक्षणाधिकारी, जि. प. पुणे~~ / गट शिक्षणाधिकारी, पं. स. आंबेगाव यांचेशी संपर्क साधावा. तसेच शाळेची वेळेत तपासणी करुन घेवून तपासणी अहवाल त्वरित या कार्यालयाकडे सादर करणेत यावा.

ज्या माध्यमिक शाळांमध्ये नैसर्गिक वाढीने इ. १० वीचा वर्ग सुरु होत आहे अशा सर्व माध्यमिक शाळांनी मा. विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे १० यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा. त्याबाबत आवश्यक असणा-या कागदपत्रांची यादी सोबत देणेत येत आहे. त्याप्रमाणे कागदपत्रांची पूर्तता वेळेत करावी अन्यथा शाळेस संकेतांक न मिळाल्यास हे कार्यालय जबाबदार रहाणार नाही याची नोंद घेणेत यावी. [ मागील बाजूस कागदपत्रांची यादी आहे. ]

मुख्याध्यापक
[illegible] विद्यालय, तिरपाड
ता. आंबेगाव, जि. पुणे

J. N. H.
शिक्षणाधिकारी [माध्यमिक]
जिल्हा परिषद पुणे. करिता.

" यशवंतराव चव्हाण भवन "
जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग [ माध्यमिक ]
जा. क्र. शिक्षण/माध्य/ह-४ नै. वाढ/२००१-०२
पुणे, दि. ५/६/२००१

प्रति,

मुख्याध्यापक,/मुख्याध्यापिका,

वनेश्वर माध्यमिक विद्यालय, तिरपाड.
ता. आंबेगाव

विषय :- नैसर्गिक वाढीने परवानगी देणे बाबत. सन ~~१९९९-२~~ २००१-०२,
~~इ. ६ वी~~, ~~इ. ७ वी~~, इ. ९ वी, ~~इ. १० वी~~.

आपल्या आदिवासी समाजसेवा शि. प्रसा. मंडळ द्वारा संचालित वनेश्वर माध्य. विद्यालय, तिरपाड. माध्यमिक शाळेतील इ. ८ वी / ~~इ. ५ वी~~ चे वर्गास [ माध्यम मराठी / ~~इंग्रजी~~ ] सन २००० -२००१ या शैक्षणिक वर्षापासून मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचेकडील आदेश क्र. माध्यम / ३ [१३]/ नवाशा / मान्यता / पुवि /३०९६/२००० दि. ८/३/०१ अन्वये शासनाची परवानगी मिळालेली आहे. सन २००१ – २००२ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या माध्यमिक शाळेत ~~इ. ६ वी~~, ~~इ. ७ वी~~, इ. ९ वी, ~~इ. १० वी~~ चा वर्ग ———— नैसर्गिक वाढीने सुरु होत असून सदर वर्गास परवानगी देणेत येत आहे. तरी आपण सदर वर्गाची वार्षिक तपासणी करुन घेणेसाठी उपशिक्षणाधिकारी जि. प. पुणे / गट शिक्षणाधिकारी, पं. सं.आंबेगाव यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा. तसेच शाळेची वेळेत तपासणी करुन घेऊन तपासणी अहवाल या कार्यालयाकडे त्वरित सादर करणेत यावा.

~~ज्या माध्यमिक शाळांमध्ये इ. १० वी चा वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत आहे त्या माध्यमिक शाळांनी मा. विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे – १० यांचे कार्यालयाशी सकेतांक मिळणेसाठी लागणारी कागदपत्रे सादर करणे बाबत संपर्क साधावा.~~

[signature]
मुख्याध्यापक
वनेश्वर मा. विद्यालय, तिरपाड
ता. आंबेगाव, जि. पुणे

J.N.H. [signature]
शिक्षणाधिकारी [माध्यमिक]
जिल्हा परिषद पुणे करिता.